# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १४/०२/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. खापा** :— दिनांक १४/११/२०१५ चे १३.०० वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे अप. क्र. ११४/२०१५ कलम ३६३, ३६६, ३७६(२)(एन) भादवी सहकलम ४, ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०९/११/२०१५ चे १०.०० वा. चे सुमारास आरोपी नामे— मनोज हजरीलाल धुर्वे, वय २१ वर्ष, रा. चक्की खमारिया ता. कुरई जि. सिवनी म.प्र. ह. मु. कावरापेठ नागपूर हा फिर्यादी यांचे गावी ओळखीचे घरी येत जात होता. फिर्यादीची मुलगी वय १७ वर्षीय पिडीता हिच्या अल्पवयीनपणाचा फायदा घेऊन लग्नाचे आमिष दाखवून आरोपीने तिला पळवून नेले. आरोपीला दिनांक १८/११/२०१५ चे ०१.४० वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. सतिश सोन्टक्के, पो.स्टे. खापा यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक १४/०२/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. आर. आर. पटारे, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये १० वर्ष सश्रम कारावास व १०,०००/—रु. दंड व दंड न भरल्यास ३ महिन्याची साधी कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. दिपीका गवळी यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी कर्मचारी म्हणुन पोलिस हवालदार श्री. रमेश ताजने पो.स्टे. खापा तर सहा.फौज. श्री. भवानीप्रसाद मिश्रा यांनी मदत केली आहे.

### शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीविरूध गुन्हा नोंद

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०४ कि.मी अंतरावरील मौजा बिना जुनी वस्ती येथे दिनांक १२/०२/२०२२ चे २३.०० वा. ते २३.३० वा. दरम्यान एमएच— ४०/बीजी— ७८७३ क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपी नामे— १) कैलाश शुक्कलाजी उईके, वय ३९ वर्ष, रा. कालापाठा पारशिवनी, २) ट्रक मालक आरोपी नामे— गोपाल पांडे यांनी संगनमत करून बिना संगम कन्हान नदीच्या पात्रातुन अवैध्यरित्या मालकाचा सहमतीने त्यांच्या ताब्यातील वाहनात ०६ ब्रॉस रेती चोंरून नेत आसतांनी मिळुन आले. आरोपी सदर वाहनात त्याचे सोबत असलेले पोलीस कर्म परमेश्वर कोकाटे पोस्टे नवीन कामठी यांना सदर ट्रकमध्ये बसवुन पो.स्टे. खापरखेडा गुन्हा नोंद करने कामी जात असतांनी यातील नमुद चालकाचे रस्त्यावर चालत्या गाडीतुन रेती खाली केली सदरचा ट्रक मालक नामे— गोपाल पांडे हे घटनास्थळी येवुन फिर्यादी सोबत वाद घालुन सरकारी कामात अळथळा निर्माण केला.

सदर प्रकरणी सरतर्फे राजेश महादेव माळी, वय २९ वर्ष, प.री. नायब तहसीलदार कामठी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३५३, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी

क्र. १ ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि धोपाडे मो. क्र. ९९२३०४७०७९ हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत ०३ कि.मी अंतरावरील मौजा आकोली येथे दिनांक ११/०२/२०२२ चे १०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ.ललीता ज्ञानेश्वर ठवकर,वय ४२ वर्ष रा. आकोली ता.कुही जि. नागपुर यांच्या घरासमोर आरोपी १) उषा कातुरे, २) विमल कातुरे व ३) रामा कातुरे तिन्ही रा. आकोली यांचा घर असल्याने आरोपीच्या मुलाने फिर्यादीच्या घरासमोर तुराटीच्या काडया फेकल्याने त्याला हटकले असता यातील आरोपी क्र. १ ने फिर्यादीस 'माझ्या मुलाला काय म्हणतेस' असे म्हणुन फिर्यादीचे केस ओडताळ करून यातील तिन्ही आरोपीतांनी संगनमत करून शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली व हातबुक्कीने उजव्या खांदयावर मारहाण करून जमिनीवर पाडले. फिर्यादीच्या खांदयाला मुका मार लागल्याने तिला ग्रामीण रूग्णालय कुही येथे उपचार करून नागपुर मेडीकल कॉलेज नागपूर येथे रेफर केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास नापोशी गुरपुडे मोनं. ९५५२५३१००२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**